**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२४०/२०२१ मधील अर्ज नि.क्र.२० वरील आदेश</u>**
**<u>(श्रीमती बालिका कदम व इतर वि. साहेबजादी पिरजादे वगैरे)</u>**

**CNRMHSN06001972-2021**

१. प्रस्तुतचा अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याबाबत विनंती केली आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी यांच्या अर्जामधील कथन असे की, प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना लागू होऊन ते याकामी हजर झालेले आहेत. परंतु, वादीने दिलेल्या महसूल कोर्टाचे निकालाचे संदर्भात माहिती मिळाली नसलेने तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये प्रतिवादींचे माहितगार वकीलांवर इंन्जो प्लास्टी झाल्यामुळे त्यांना वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. सबब त्यांनी त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेकामी विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी नि.क्र.२० कडे सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादींना दाव्याचे समन्स दि.०९/११/२०२१ रोजी मिळाले होते व त्यानंतर हजर होऊन त्यांनी वेळोवेळी मुदती घेतलेल्या आहेत. त्यानंतर ब–याच कालावधीनंतर प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला असून त्यांचा अर्ज नामंजूर करावा व प्रतिवादींना जादा दंड बसविणेत यावा अशी विनंती वादींनी केली आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादींनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादीस दाव्यास कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंबाबाबत महसूल कोर्टाचे निकालाचे संदर्भात माहिती मिळाली नसलेने तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये प्रतिवादींचे माहितगार वकीलांवर इंन्जो प्लास्टी झाल्यामुळे झाल्याचे प्रतिवादींचे कथन योग्य व संयुक्तिक वाटत नाही. परंतु, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादींना एक संधी देणे आवश्यक वाटते. तसेच प्रतिवादींनी त्यांची कैफियत ही उशिराने दाखल केल्यामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडल्याने सदरचा अर्ज खर्च म्हणून वादींना देण्याच्या अटीवर मंजूर करणे

योग्य वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज रक्कम रुपये २००/- (र.रु. दोनशे मात्र) खर्च म्हणून वादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD

Digitally signed by SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD
Date: 2022.07.21 11:17:16 +0530

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे-गरड )**

दि. २०/०७/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 2nd Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 20.07.2022. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 20.07.2022. |
| Order uploaded on. | : | 21.07.2022. |